प्रेसनोट दि.२५/०६/२०२०

# ०५ वर्षापासुन पुणे ग्रामीण, रायगड, अहमदनगर येथील पोलीसांना गुंगारा देणारा कुख्यात रमेश पडवळ टोळीतील अट्टल दरोडेखोर गुन्हे शाखा, युनिट ५ कडुन जरेबंद

मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड श्री संदिप बिष्णोई सो यांनी राबविलेल्या पाहीजे फरारी मोहीमे अंतर्गत श्री. बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड यांनी पाहीजे फरारी आरोपी शोधणेकरीता गुन्हे शाखा युनिट ५ कडील अधिकारी व कर्मचारी यांना आदेशीत करुन सुचना दिल्या होत्या. आदेशाप्रमाणे कारवाई करीत असताना गुन्हे शाखेकडील **पोलीस कर्मचारी फारुक मुल्ला व नितीन बहीरट** यांना बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, अट्टल दरोडेखोर **अजय ऊर्फ अजित ऊर्फ आज्या शिंदे** हा खेडमधील पाराडी येथील डोंगरामध्ये निर्जन काटेरी वनामध्ये लपुन छपुन आपले कुटुंबासह वास्तव्य करत आहे अशी खात्रीशीर बातमी मिळल्याने सदरची बातमीचा आशय श्री.बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट ५ यांना कळविला असता त्यांनी गुन्हे शाखा युनिट ५ कडील पोलीस कर्मचारी फारुक मुल्ला, नितीन बहिरट, राजमुमार इघारे व दयानंद खेडकर यांचे एक शोध पथक तयार करुन त्यांना योग्य त्या सुचना व मार्गदर्शन करुन कारवाई करणेबाबत आदेशीत केले.

त्यावर सदरचे शोध पथक मिळालेल्या बातमीचे ठिकाणी बातमीदारासह गेले असता अजय शिंदे तो रहात असलेल्या ठिकाणी नसल्याचे दिसुन आले. तपास पथकाने तेथे सापळा रचुन तो त्याचे घरी येण्याची वाट पहात थांबले. पहाटे ०४ चे सुमारा कोणीतरी अज्ञात इसम त्या निर्जन घराकडे येताना दिसुन आला असता बातमीदाराने येणारा इसम हा आज्या अशोक शिंदे असल्याबाबत खात्री केली असता त्या इसमास शिताफिने ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव **अजय ऊर्फ आज्या ऊर्फ अजित आशोक शिंदे वय २५ वर्ष रा. निमगाव दावडी ता. खेड जि पुणे** असे सांगीतले. त्यास गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड कार्यालयामध्ये आणुन त्याचेकडे सखोल तपास केला असता त्याने **तो पुण्यामधील खेड तालुक्यातील कुख्यात दरोडेखोर रमेश बाळु पडवळ याचे टोळीचा सदस्य असल्याचे सांगुन त्यांचे टोळीने महाराष्ट्र राज्यातील पुणे, अहमदनगर, रायगड जिल्हयामधील विवीध ठिकाणी दरोडे घातले असल्याचे सांगितले.**

**आज्या अशोक शिंदे हा खालील गुन्हयामध्ये पाहीजे आरोपी आहे.**

1. **तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ८९/२०१६ भा.द.वी. ३९५**
2. **तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर २३१/२०१६ भा.द.वी. ३९९,४०२ म.पो.का.क.३७(१)(३) १३५**
3. **खालापुर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ६३/२०२० भा.द.वी ३९५, ३६३, आर्म ॲक्ट ४(२५) (२७)**
4. **मंचर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १६/२०१६ भा.द.वी ३७९, ३४**
5. **रांजणगाव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. १३८/२०१५ भादविक ३७९, ३४**
6. **शिरुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. ३२४/२०१६ भादविक ३७९, ३४**
7. **शिरुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. २९२/२०१६ भादविक ३७९, ३४**
8. **पारनेर पोलीस स्टेशन, अहमदनगर गु.र.नं. २७४/२०१८ भादविक ४५७, ३८०, ४११**
9. **पारनेर पोलीस स्टेशन, अहमदनगर गु.र.नं. २०९/२०१७ भादविक ३८०**
10. **खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. २४६/२०१५ भादविक ३९४, ३४**
11. **कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर गु.र.नं. ११६९/२०१९ भादविक ३९४**

अजय **ऊर्फ आज्या ऊर्फ अजित आशोक शिंदे** हा सुमारे ०५ वर्षपासुन पोलीसांना गुंगारा देवुन आपले अस्तित्व लपवुन पुणे जिल्हयातील वेगवेगळया निर्जन ठिकाणी रहात होता. त्याचा पुणे ग्रामीण कडील १. मंचर पोलीस स्टेशन, २. राजंणगाव पोलीस स्टेशन, ३. वडगाव मावळ पोलीस स्टेशन, ४. खेड पोलीस स्टेशन, ५. आळेफाटा पोलीस स्टेशन, ६. शिक्रापुर पोलीस स्टेशन तर अहमदनगर जिल्हयातील ७. पारनेर पोलीस स्टेशन, ८. कोतवाली पोलीस स्टेशन, ९. राहुरी पोलीस स्टेशन व १०. बेलवंडी पोलीस स्टेशन तर रायगड जिल्हयातील ११. खालापुर पोलीस स्टेशन कडील तपास पथके शोध घेत होती.

आरोपी नामे **अजय ऊर्फ आज्या ऊर्फ अजित आशोक शिंदे वय २५ वर्ष रा. निमगाव दावडी ता. खेड जि पुणे** यास पुढील तपास कामी तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त मा.श्री संदिप बिष्णोई, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा.श्री सुधिर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त गुन्हे मा.श्री राजाराम पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.बाळकृष्ण सावंत, सहा पोलीस निरीक्षक श्री.राम गोमारे व पोलीस कर्मचारी फारुक मुल्ला, नितिन बहिरट, राजकुमार इघारे, दयानंद खेडकर, श्यामसुदंर गुटे, राजेंद्र शेटे, नागेश माळी, भरत माने, दत्तात्रय बनसुडे, धनराज किरनाळे, स्वामीनाथ जाधव, मयुर वाडकर, संदिप ठाकरे, सावन राठोड, ज्ञानेश्वर गाडेकर, गणेश मालुसरे, धनंजय भोसले, गोपाळ ब्रम्हांदे यांनी केली आहे.